# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०३/२०२५ ( सोमवार ) दुपार**

---

## खुन करणाऱ्या अज्ञात आरोपीतांचा १२ तासात लावला शोध
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोस्टे कन्हान** :—फिर्यादी नामे जितेंद्र टिकाराम बर्वे, वय ३२ वर्षे,सद्भावन नगर,पानतावने कॉलेज जवळ कांद्री कन्हान यांनी पोलीस स्टेशन कन्हान येथे रिपोर्ट दिली की, त्यांचा भाऊ नामे महेंद्र टिकाराम बर्वे, वय ३२ वर्षे,सद्भावन नगर,पानतावने कॉलेज जवळ कांद्री कन्हान हा दिनांक २३/०३/२०२५ चे रात्री २२:३० वाजता जेवण झाल्यावर त्याच्या फोनवर बोलत घराचे बाहेर फिरत होता. मृतक रात्रभर घरी परत न आल्याने मृतकाच्या पत्नीने फिर्यादीला सदर बाब सांगितली.त्यामुळे फिर्यादी व मृतक ची पत्नी यांनी दोघांनी मिळुन मृतकाचा शोध घेत असतांना मृतकच्या पत्नीला फोन आला की, मृतक नामे महेंद्र टिकाराम बर्वे याचे प्रेत हरडे ले आउट येथे पडले असुन त्याला कोणीतरी अज्ञात आरोपीने धारदार शस्त्राने वार करून त्याचा खुन केला आहे. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे अज्ञात आरोपी विरूद्ध कलम १०३(१) भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदशनात कन्हान पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी तात्काळ अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला. गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करत स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांनी अवघ्या १२ तासात आरोपीतांचा शोध लावला. सदर गुन्हयात पोलीसांनी आरोपी नामे तुषार राजेश गुरधे, वय २३ वर्षे,रा पिंपरी कन्हान याला ताब्यात घेतले आहे. नमुद आरोपी आणि त्याच्या सह तीन विधीसंघर्ष बालकांनी मिळुन पैशांच्या वादातुन मृतकाचा खुन केल्याची माहीती प्राप्त झाली आहे. अरोपी अटकेची प्रक्रीया सुरू आहे.**

# खुन करणाऱ्या तीन आरोपीतांना कोर्टातुन आजीवन कारावासाची शिक्षा

पो.स्टे. कन्हान :— फिर्यादी नामे संदीप प्रमोद खडसे, वय २६ वर्षे, रा. सत्रापुर, कन्हान ता. पारशिवणी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्र. ०४/२०२० कलम ३०२,३४ भादंवि सहकलम ३ (२) ¼व्ही½ अ.जा.ज.अ.प्रति.अधिनियम Vन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत यप्रमाणे आहे की, दिनांक ०६/०१/२०२० चे २२/०० ते २२/४५ वाजेच्या दरम्यान गौरव बार ,कन्हान येथे आरोपी नामे भुपेश उर्फ गोलु सुशिलकुमार शाहु, वय २० वर्षे, रा. कळमना मार्केट, नागपुर याने जोरात काचेचा ग्लास आपटुन तोडल्याने यातील मृतक नामे संजीव प्रमोद खडसे, वय ३४ वर्षे, रा. सत्रापुर कन्हान ता. पारशिवणी हा आरोपीला समजावित असतांना यातील आरोपी व मृतक यांच्या बाचाबाची झाली. त्यावेळी यातील आरोपी सचिन प्रकाश वाडीभस्मे, वय २९ वर्षे, रा. रायनगर कन्हान याला मृतकाने दोन थापडा मारल्या त्यामुळे यातील आरोपी नामे **१. भुपेश उर्फ गोलु सुशिलकुमार शाहु, वय २० वर्षे, रा. कळमना मार्केट, २. सचिन प्रकाश वाडीभस्मे, वय २९ वर्षे, रा. रायनगर, कन्हान, ३. नितेश मुलचंद पटले, वय ३० वर्षे, रा. कळमना मार्केट, नागपुर आणि ४. स्वप्नील उर्फ चुहा महेंद्र मराठे, वय २१ वर्षे रा. कांद्री, कन्हान** यांनी संगणमत करून मृतक संजीव प्रमोद खडसे, वय ३४ वर्षे, रा. सत्रापुर कन्हान, ता. पारशिवणी हा गौरव बार च्या बाहेर आल्यानंतर नमुद आरोपीतांनी दगड व चाकुने मृतकच्या डोक्यावर व पोटामध्ये वार करून गंभीर जखमी करून मृतकाचा खुन केला.

सदर प्रकरणाचे तपास उपविभागिय पोलीस अधिकारी श्री संजय पुंजलवार यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायधीश (डि.जे.२) श्री. अब्बास शेख यांनी दिनांक २४/०३/२०२५ रोजी वरील नमुद आरोपी नामे **१. भुपेश उर्फ गोलु सुशिलकुमार शाहु, वय २० वर्षे, रा. कळमना मार्केट,नागपुर २. सचिन प्रकाश वाडीभस्मे, वय २९ वर्षे, रा. रायनगर कन्हान, ३. स्वप्नील**

**उर्फ चुहा महेंद्र मराठे, वय २१ वर्षे, रा. कांद्री, कन्हान** यांना कलम **३२०,३४ भादवि मध्ये** तिन्ही आरोपीतांना आजीवन कारावास व प्रत्येकी १० हजार रूपये दंड ,दंड न भरल्यास प्रत्येकी ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.आरोपी नामे **नितेश मुलचंद पटले हा मयत झालेला आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री. प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार इश्वर हुड पो.स्टे.कन्हान यांनी मदत केली आहे.